## सेवाखंड क्षमापन

अशासकीय उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी निवृत्तीवेतन योजना सेवाखंड क्षमापित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन – शिक्षण सेवायोजन विभाग, परिपत्रक क्रमांक पीईएन-१०८८/१२०९७३/(५८२) माशि-६ दिनांक १० मे १९८९ शासन निर्णय दिनांक ४/११/१९६८ व दिनांक ३०/८/१९७२ च्या परिच्छेद ७ मधील तरतूदी व अटींच्या अधीन राहून अशासकीय उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयातील शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवेतील सेवाखंड निवृत्तीवेतनाकरीता क्षमापित करण्याबाबतचे अधिकार हे विभागीय उपसंचालकांना प्रदान करण्यात आले आहेत. संस्थ्ेला या संदर्भात कोणतेही अधिकार देण्यात आलेले नाहीत. जे सेवाखंड शिक्षण उपसंचालक क्षमापित करु शकतात त्या बाबतच्या नोंदी फक्त संस्थ्ेकडून करुन घेण्यात याव्यात.

### प्रस्ताव सादर करताना आवश्यक ती कागदपत्रे

१. शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद यांची स्पष्ट शिफारस.

२. संबंधिताचा विनंती अर्ज.

३. सेवाखंडाचे कारण.

४. सेवाखंड क्षमापनासाठी संस्थ्ेचा ठराव.

५. संबंधीतांचे सेवाखंड कालावधीत इतरत्र सेवा न केल्याचे रु. १००/- चे स्टँम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र.

६. सेवा दाखले, सेवा कालावधी तक्ता.

७. मुख्याध्यापकांचा सेवाखंड क्षमापनाचा प्रस्ताव असल्यास संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांची स्वाक्षरी प्रमाणपत्रावर त्यांचे स्वाक्षरीने प्रस्ताव.

८. सेवाखंड तक्ता.

९. मूळ सेवापुस्तक.

**वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रांसहीत दोन प्रतीत प्रस्ताव.**